**संयुक्त सचिव (पूर्व आशिया) यांची चीन भेट (डिसेंबर 11, 2025)**

12 डिसेंबर 2025

संयुक्त सचिव (पूर्व आशिया) श्री. सुजीत घोष यांनी 11-12 डिसेंबर 2025 दरम्यान बीजिंग, चीन येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी उप-परराष्ट्र मंत्री श्री सुन वेईडोंग यांची भेट घेतली तसेच चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या आशियाई व्यवहार विभागाचे महासंचालक यांच्याशी 11 डिसेंबर 2025 रोजी बीजिंग येथे चर्चा केली.

2. ही चर्चा विधायक आणि भविष्य वेधक स्वरूपाची होती. उभय बाजूंनी दोन्ही देशांच्या नेत्यांच्या धोरणात्मक मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि लोक-केंद्रित उपक्रमांना प्राधान्य देत द्विपक्षीय संबंधांचे स्थैर्य पुनर्स्थापित करण्याच्या व पुनर्बांधणीच्या प्रक्रियेत झालेल्या प्रगतीचे सकारात्मक मूल्यमापन केले.

3. येत्या वर्षासाठी नियोजित असलेल्या आदान-प्रदान व उपक्रमा यांचा उभय बाजूंनी आढावा घेण्यात आला. भारताने निर्यात नियंत्रणाशी संबंधित प्रलंबित मुद्द्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्याची गरज अधोरेखित केली. परस्पर हिताच्या प्रादेशिक व जागतिक घडामोडींवरही थोडक्यात चर्चा करण्यात आली.

4. या भेटीदरम्यान, संयुक्त सचिव (पूर्व आशिया) यांनी चीनच्या वाणिज्य मंत्रालयातील आशियाई व्यवहार विभागाचे महासंचालक यांचीही भेट घेतली व द्विपक्षीय व्यापार व व्यावसायिक मुद्द्यांवर चर्चा केली.

बीजिंग

12 डिसेंबर 2025